18 AUG 2022 लोकसत्ता जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘अस्मिता’ जपणाऱ्या देणगीतून साकारणार विद्यार्थिनींचे वसतिगृह!

## आजारी मुलीसाठीची ३५ लाखांची तरतूद तिच्यापाठी समाजास अर्पण

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** सुदृढावस्थेत जन्मलेली बालिका ताप येण्याचे निमित्त होऊन वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षीच इंद्रियशिथिल बनते. तिला पूर्ववत करण्याचा संघर्ष आई-बापाचा सुरू होतो. हे मूल आता बरे होऊ शकणार नाही, या वस्तुस्थितीसह ते तिला जिवापाड सांभाळतात. आपल्या माघारी तिच्या आयुष्याची तरतूद म्हणून पै न पै जोडून ३५ लाख रुपयांची बचत करतात. वयाच्या ४५ व्या वर्षी ती मुलगी अखेरचा श्वास घेते. तिच्या जाण्याने कोलमडून पडलेले हे दाम्पत्य दुःखाच्या प्रसंगीसुद्धा सामाजिक भान ठेवणारा निर्णय घेतात. त्या मुलीचेच असणारे ३५ लाख रुपये तिच्याच स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करतात.



रजनी आणि पंडित मारूलकर या दाम्पत्याने ३५ लाखाची देणगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याकडे सुपूर्द केली.

हा हृद्य सोहळा विद्यापीठामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये घडला. या निधीमधून विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थिनींसाठीचे वसतिगृह साकारले जाणार आहे.

येथील पंडित सदाशिव मारुलकर आणि रजनी पंडित मारुलकर हे या ज्येष्ठ दाम्पत्याचे नाव. मारुलकर हे विद्यापीठातून साहाय्यक कुलसचिव पदावरून निवृत्त झाले.

त्यांची कन्या अस्मिता हिच्या जीवनाची शोकांतिका ठरली. मुलीचाच अधिकार असलेल्या रकमेचा विनियोग स्वतःसाठी न करता समाजासाठी करण्याचा निर्णय मारुलकर दाम्पत्याने घेतला.

### कोनशिलेलाही प्राप्त होणार ‘अस्मिता’

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी वसतिगृहाच्या प्रथम मजल्यावर ‘रजनी पंडित मारुलकर आणि पंडीत मारुलकर यांनी कन्या अस्मिता हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून या मजल्याचे बांधकाम झाले’ अशी कोनशिला दर्शनी भागात बसविण्यात येईल. मारुलकर दाम्पत्याने दातृत्वाचे उदाहरण जगासमोर ठेवले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मारुलकर यांची सेवेमधील चोख कामगिरी आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यास सदैव तत्पर असलेल्या वृत्तीचा गौरव केला.

लोकमत

# 'डीआरके कॉलेज'मध्ये अत्याधुनिक सभागृह

## देशपांडे यांच्या स्मरणार्थ देणगीतून उभारणी

**कोल्हापूर :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (डीआरके)मध्ये पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाचे उद्घाटन मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. डीआरके कॉलेजच्या माजी प्राध्यापिका पुष्पा देशपांडे-राशिवडेकर यांच्या स्मरणार्थ त्यांचे आतेभाऊ अचल कुलकर्णी यांनी कौन्सिल ऑफ एज्युकेशनला २५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यातून अत्याधुनिक सभागृहाची उभारणी करण्यात आली. देणगी देणाऱ्या कुलकर्णी आणि त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते करण्यात आला. रत्नाप्पा यांच्या दूरदृष्टीस अनुसरून महाविद्यालय विकास करीत असल्याचे रजनीताई मगदूम यांनी सांगितले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक ॲड. वैभव पेडणेकर, अमित बाडकर, प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे, डॉ. नारायणन आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अश्विनी मगदूम यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# 'यूजीसी'ची दूरशिक्षणच्या अभ्यासक्रमांना मान्यता

## शिवाजी विद्यापीठ: प्रवेश प्रक्रिया आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ (दूरशिक्षण) आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) बुधवारी मान्यता दिली. या केंद्राकडील प्रवेश प्रक्रियेची सुरुवात आज, गुरुवारपासून होणार आहे. त्यामुळे नोकरी, व्यवसाय करून शिक्षण घेणाऱ्या साडेपाच हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला.

पूर्णवेळ संचालक नसल्याने यूजीसीने दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेची मान्यता गेल्या वर्षी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोखली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण झाला. त्यावर विद्यापीठाने या केंद्राच्या संचालकांची २६ डिसेंबर रोजी नियुक्ती केली. त्रुटींच्या पूर्ततेचा अहवाल यूजीसीला १२ जानेवारी रोजी पाठविला. त्यानंतर विद्यापीठाला मान्यतेची प्रतीक्षा लागली. यूजीसीने बुधवारी मान्यता दिली. त्यात बी.ए., बी.कॉम., एम.ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम.ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन असून कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, बंदीजन, आदी शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवेश घेता येणार आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठीची प्रवेशप्रक्रिया यापूर्वीच झालेली असून, त्यामधील पात्र उमेदवारांना प्रवेश देण्याची कार्यवाही लवकर होईल. ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड तयार करून नोंदणी करावी, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले.



दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना यूजीसीची मान्यता मिळाल्याने ज्या व्यक्ती व्यवसाय, नोकरी व अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित राहिलेल्या आहेत, काही कारणांनी ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिलेले आहे, अशा व्यक्तींना या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल.

**- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू**

18 AUG 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व दूरस्थ अभ्यासक्रमांना 'यूजीसी'ची मान्यता

## शिवाजी विद्यापीठ : प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्याकडून मान्यता मिळाली असून, विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ करण्यात येत असल्याची माहिती केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी बुधवारी दिली.

या मान्यतेसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि विद्यापीठाची विविध अधिकार मंडळे यांचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

यूजीसीकडून मान्यता मिळालेल्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम.ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर प्रवेशाबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठीची प्रवेशप्रक्रिया यापूर्वीच झालेली असून, त्यामधील पात्र उमेदवारांना प्रवेश देण्याची कार्यवाही लवकरच होत आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा यूजर आयडी व पासवर्ड तयार करून नोंदणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यार्थ्याने निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. प्रथम वर्षाचा ऑनलाईन अर्ज नव्याने सादर करताना ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेची कागदपत्रे (पासबुक, डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय/ खाते क्रमांक/आयएफएससी कोड इ.) सोबत ठेवणे गरजेचे आहे. संपूर्ण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यास केंद्रावर जमा करण्याची मुदत शुल्कासह १५ ऑक्टोबरपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ०२३१-२६०९४५१ व २६०९४५२ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.



शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्र

### विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची वैशिष्ट्ये

१२ प्रोग्राम्सअंतर्गत विविध अभ्यासक्रम / दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध / २ विभागीय केंद्रे, ८१ अभ्यास केंद्रे, दुर्गम भागांचाही समावेश / अभ्यास केंद्रांमध्ये संपर्कसत्रांचे आयोजन / विद्यार्थ्यांना विषयतज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन / ऑनलाईन व्हिडीओ मार्गदर्शन सत्रांचाही समावेश / विद्यार्थ्यांना नेट/सेट तसेच स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन.

### प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी : कुलगुरू

दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यता मिळाली असल्याने ज्या व्यक्ती व्यवसाय, नोकरी व अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित आहेत, अगर काही कारणांनी ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिलेले आहे त्यांनी या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन कुलगुरू शिर्के यांनी केले आहे.

18 AUG 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात स्वराज्य रॅलीसह सामूहिक राष्ट्रगान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि स्वराज्य महोत्सव या निमित्ताने बुधवारी शिवाजी विद्यापीठात विशेष स्वराज्य रॅलीसह सामूहिक राष्ट्रगीत गायन उपक्रम उत्साही वातावरणात झाला. यात विद्यार्थी-विद्यार्थिनींसह सर्वच घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

'आजादी का अमृतमहोत्सव', शिवाजी विद्यापीठाचा हिरकमहोत्सव आणि स्वराज्य महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने विद्यापीठातर्फे विविध उपक्रमांचे गेल्या पंधरवड्यात आयोजन करण्यात आले. स्वराज्य महोत्सवाच्या अंतिम पर्वात बुधवारी सकाळी १० वाजता विशेष स्वराज्य रॅली पार पडली. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अँड रिसर्च अर्थात सायबर संस्थेपासून या रॅलीचा प्रारंभ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी चिखली येथील आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाचे विद्यार्थी स्वराज्य ज्योत घेऊन सहभागी होते.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात ११ वाजता सामूहिक राष्ट्रगीत गायन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, दुपारी राष्ट्रीय सेवा योजना आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहात देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित सामूहिक राष्ट्रगीत गायनामध्ये सहभागी झालेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि अन्य विद्यार्थी-विद्यार्थिनी.**

18 AUG 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



















कोल्हापूर: भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळी ११ वाजता शहरात विविध ठिकाणी सामुदायिक राष्ट्रगीत गायले. यावेळी एक मिनीट संपूर्ण परिसर स्तब्ध झाला होता. (सर्व छाया : अर्जुन टाकळकर)

# अवघे शहर भारावले!

## विविध ठिकाणी सामूहिक राष्ट्रगीत गायन संपन्न

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वराज्य महोत्सवांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ठीक ११ वाजता सामूहिक राष्ट्रगीत गायन उत्साहात झाले. या उपक्रमामुळे शहरवासीय राष्ट्रभक्तीने भारावून गेले.

यावेळी खासदार धैर्यशील माने, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, अपर जिल्हाधिकारी किशोर पवार, निवासी उपजिल्हाधिकारी दत्तात्रय कवितके, प्रांताधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच महसूल विभाग, जिल्हा माहिती कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यात शासकीय, खासगी आस्थापना, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठामध्ये 'सामूहिक राष्ट्रगीत गायन' उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला, असे जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी सांगितले.

### अंबाबाई मंदिर परिसर

भारतमातेच्या प्रेमापोटी बुधवारी करवीर निवासिनी अंबाबाई भक्तांनी एक मिनीट आहे त्या ठिकाणी उभे राहत राष्ट्रगीत गायले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यभर सकाळी ११ वाजता सामुदायिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. यामध्ये अंबाबाई दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांनी सहभाग घेत देशभक्तीची प्रचिती उपस्थितांना करून दिली.

श्रावण महिना त्यातच सलग आलेल्या सुट्यांमुळे गेल्या चार दिवसांपासून अंबाबाई दर्शनाला मोठी गर्दी होत आहे. त्यातच राज्यभर अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध उपक्रम सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून बुधवारी सकाळी ११ वाजता सामुदायिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. त्यामुळे मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभे असलेल्या भाविकांनीही असेल त्या जागीच स्तब्धता पाळत राष्ट्रगीत गायले. यावेळी मंदिराचा परिसर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला. दरम्यान, याचवेळी मंदिरालगतच्या महाद्वार रोड, भवानी मंडप, जोतिबा रोड अशा गजबजलेल्या ठिकाणीही एक मिनिटाची स्तब्धता आणि राष्ट्रगीत गुंजत होते.

### विद्यापीठात स्वराज्य रॅली

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि स्वराज्य महोत्सव यानिमित्ताने बुधवारी शिवाजी विद्यापीठात विशेष स्वराज्य रॅलीसह सामूहिक राष्ट्रगीत गायन उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी-विद्यार्थिनींसह सर्वच घटकांचा या उपक्रमात सहभाग राहिला. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

आजादी का अमृतमहोत्सव, शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव आणि स्वराज्य महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने विद्यापीठातर्फे अनेकविध उपक्रमांचे गेल्या पंधरवड्यात आयोजन करण्यात आले. अंतिम पर्वामध्ये बुधवारी सकाळी १० वाजता विशेष स्वराज्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अँड रिसर्च अर्थात सायबर संस्थेपासून या रॅलीस प्रारंभ झाला. चिखली येथील आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाचे विद्यार्थी स्वराज्यज्योत घेऊन रॅलीत सहभागी झाले. ही रॅली विद्यापीठाच्या एनसीसी भवन येथील द्वार क्र. ८ येथे येऊन तेथून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास प्रदक्षिणा पूर्ण करून मुख्य प्रशासकीय भवनापासून राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात रॅलीचे आगमन झाले. रॅलीदरम्यान विद्यार्थी राष्ट्रभक्तिपर घोषणा देत होते. त्याचप्रमाणे राष्ट्रभक्तिपर गीतेही वाजवण्यात येत होती. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली झाली.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात रॅलीचे रूपांतर सभेत होऊन ११ वाजता राष्ट्रगीत गायन करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, प्राचार्य, शिक्षक, अधिकारी उपस्थित होते.

18 AUG 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ दूरस्थ अभ्यासक्रमांना अनुदान आयोगाची मान्यता

## प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्याकडून मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ करण्यात येत आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी बुधवारी येथे दिली.




डॉ. मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, यूजीसीकडून मान्यता मिळालेल्या बी. ए., बी. कॉम., एम. ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम. ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एम. बी. ए या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदिजन आदी शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशाबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया यापूर्वीच झालेली असून, त्यामधील पात्र उमेदवारांना प्रवेश देण्याची कार्यवाही लवकरच होत आहे, याचीही नोंद घ्यावी. ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा यूजर आयडी व पासवर्ड तयार करून नोंदणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यार्थ्याने निवडलेले अभ्यास केंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते, याचीही विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. प्रथम वर्षाचा ऑनलाईन अर्ज नव्याने सादर करताना, ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेची कागदपत्रे (पासबुक, डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय/ खाते क्रमांक/ आयएफएससी कोड इ.) सोबत ठेवणे गरजेचे आहे. संपूर्ण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यास केंद्रावर जमा करण्याची मुदत शुल्कासह दि. १५ ऑक्टोबरपर्यंत आहे. मान्यता मिळणेसाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि विद्यापीठाची विविध अधिकार मंडळे यांचे सहकार्य लाभले.

**प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के**

दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून आता मान्यता मिळाली असल्याने ज्या व्यक्ती व्यवसाय, नोकरी व अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अगर काही कारणांनी ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिलेले आहे, अशा व्यक्तींनी सदर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले आहे.

18 AUG 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व दुरस्थ अभ्यासक्रमांना मान्यता

## डॉ. मोरे; तीन जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांत प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

कोल्हापूर, ता. १७ : ''शिवाजी विद्यापीठाच्या दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून मान्यता प्राप्त झाली. विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रियेस लवकरच प्रारंभ होईल,'' अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

डॉ. मोरे म्हणाले, ''युजीसीकडून मान्यता मिळालेल्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम.ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी.



(गणित), एम.बी.ए या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली.

ही प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांत विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, बंदिजन आदी शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवेश घेता येईल.

विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबत माहिती उपलब्ध आहे. इच्छुकांनी लाभ घ्यावा. एमबीए अभ्यासक्रमासाठीची प्रवेशप्रक्रिया यापूर्वीच झाली असून, त्यामधील पात्र उमेदवारांना प्रवेश देण्याची कार्यवाही लवकर होत आहे, याचीही नोंद घ्यावी.'

### केंद्राची वैशिष्ट्ये

- १२ प्रोग्राम्सअंतर्गत विविध अभ्यासक्रम
- दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध
- २ विभागीय केंद्रे, ८१ अभ्यासकेंद्रे, दुर्गम भागांचाही समावेश
- अभ्यासकेंद्रांत संपर्कसत्रांचे आयोजन
- विद्यार्थ्यांना विषयतज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन
- ऑनलाईन व्हिडिओ मार्गदर्शन सत्रांचाही समावेश
- विद्यार्थ्यांना नेट/सेट तसेच स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन

ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा युजर आयडी, पासवर्ड तयार करून नोंदणी करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यार्थ्यांने निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते, याचीही नोंद घ्यावी. प्रथम वर्षाचा ऑनलाइन अर्ज नव्याने सादर करताना ऑनलाइन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेची कागदपत्रे (पासबुक, डेबिट/क्रेडिट कार्ड, युपीआय/खाते क्रमांक/आयएफएससी कोड) बरोबर ठेवणे गरजेचे आहे. संपूर्ण ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची मुदत शुल्कासह १५ ऑक्टोबरपर्यंत आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विविध अधिकार मंडळांचे सहकार्य लाभले.

#### वंचित विद्यार्थ्यांना संधी

दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीकडून आता मान्यता मिळाल्याने ज्या व्यक्ती व्यवसाय, नोकरी, अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अगर काही कारणांनी ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिलेले आहे, अशा व्यक्तींनी अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

18 AUG 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या पदवी प्रथम वर्षाला युजीसीकडून मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत दूरशिक्षण विभागातील प्रथम वर्षाच्या ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) कडून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आता विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. मोरे यांनी दिली.

युजीसीकडून मान्यता मिळालेल्या बी. ए., बी. कॉम., एम. ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम. ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित), एम. बी. ए या पदवी व पदव्युत्तर विषयांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली,



■ प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ : जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांना दिलासा

सातारा आदी जिल्ह्यातील ८१ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचितांना प्रवेश घेता येईल. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर प्रवेशाबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. एमबीएसाठीची प्रवेशप्रक्रिया यापूर्वीच झाली असून पात्र उमेदवारांना लवकरच प्रवेश दिला जाईल. ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड तयार करुन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर शुल्कासह जमा करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे.

## प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी: कुलगुरू डॉ. शिर्के

दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली आहे. त्यामुळे व्यवसाय, नोकरी व अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित राहिलेल्यांना प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले आहे.